ठाणे, मंगळवार दि. २० ऑगस्ट २०२४ वर्ष : १३, अंक : ११३ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**महायुतीतील वाद मिटवा**

विधानसभेची निवडणूक तोंडावर आली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने सध्या राज्यातील विधानसभा निवडणुकीची घोषणा केली नसली तरी काही दिवसात घोषणा होण्याची शक्यता आहे. ......पान २ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

कमाल ३६° से | किमान २९° से

**बाजार**

सोने ७३,२८० | चांदी ९३,६८०


**डोकं खाजवा** –अशोक सुतार



त्याला कशाला विचारता, काय आणले आहे म्हणून! सौंदर्य प्रसाधनाचे साहित्य मीच मागवले आहे. लाडकी बहिण योजनेचे पैसे मिळाले ना!

## ‘लाडकी बहीण योजने’मुळे विधानसभा निवडणूक लांबणीवर?

# डिसेंबर महिन्यात मतदान?



**मुंबई: राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीबाबत एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. त्यानुसार विधानसभा निवडणूक ही नोव्हेंबर महिन्यात न होता डिसेंबर महिन्यापर्यंत लांबणीवर पडण्याचा अंदाज वर्तवविला जात आहे. लोकसभा निवडणुकीत फटका बसल्यानंतर महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीणसह अनेक योजनांची घोषणा केली होती. मात्र, अवघ्या तीन–चार महिन्यात विधानसभा निवडणूक असल्याने या योजना राबवणार कधी आणि त्याचा प्रचार करणार कधी, असा प्रश्न सत्ताधाऱ्यांपुढे उभा ठाकला होता. या पार्श्वभूमीवर आता राज्यातील विधानसभा निवडणूक डिसेंबर महिन्यापर्यंत पुढे ढकलण्याचा घाट घालण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. (पान २ वर)**

### सरकारी योजनांचा प्रचार करण्यासाठी निवडणूक लांबणीवर?

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील एकूण ४८ जागांपैकी ३० जागांवर महाविकास आघाडी तर १७ जागांवर महायुतीच्या उमेदवारांचा विजय झाला होता. महायुतीने निवडणुकीपूर्वी ४५ पेक्षा अधिक जागा जिंकण्याचा दावा केला होता. मात्र, त्यांना अवघ्या १७ जागा मिळाल्याने महायुतीला मोठा फटका बसल्याचे स्पष्ट झाले होते. विधानसभा निवडणुकीतही याच पॅटर्नची पुनरावृत्ती होईल, अशी चर्चा सुरु झाली होती. या पार्श्वभूमीवर आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून महायुती सरकारने अनेक लोकप्रिय योजनांची घोषणा केली होती. यापैकी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही सध्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे. या योजनेनुसार २१ ते ६५ वयोगटातील महिलांना राज्य सरकार महिन्याला १५०० रुपयांची आर्थिक मदत करणार आहे. १४ ऑगस्टपासून या योजनेच्या पहिल्या हप्त्याचे पैसे लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली होती. मात्र, लगेच दोन महिन्यांत निवडणूक झाल्यास या योजनांचा महायुतीला पुरेसा प्रचार करणे शक्य नाही. ही योजना जास्तीत जास्त महिलांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. तसेच, योजेनेचे आणखी किमान दोन–तीन हप्ते तरी महिलांच्या बँक खात्यात जमा होणे आवश्यक आहे. त्याआधीच आचारसंहिता लागू झाली तर मोठा खोळंबा होण्याची शक्यता असल्याने निवडणुकीची घोषणा विलंबाने केली जाणार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.



### महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू होणार?

महाराष्ट्राच्या विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबर २०२४ रोजी संपणार आहे. त्यामुळे डिसेंबर महिन्यात निवडणूक घ्यायची झाल्यास नियोजित वेळेत नवी विधानसभा अस्तित्त्वात न आल्यास महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू होण्याची शक्यता आहे. यापूर्वी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात बरेच दिवस सरकार स्थापन होत नसल्याने राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली होती. गेल्या आठवड्यात दिल्लीत झालेल्या पत्रकार परिषदेत केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी महाराष्ट्रात गरज भासल्यास राष्ट्रपती राजवट लागू करण्याचे संकेत दिले होते.राज्यातील विधानसभेची मुदत संपल्यानंतर सहा महिन्यांच्या आत निवडणूक घेण्याची मुभा निवडणूक आयोगाला असते. त्यामुळे २६ नोव्हेंबर रोजी विधानसभा बरखास्त झाली तरी संविधानातील तरतुदीनुसार राष्ट्रपती राजवट लागू करता येऊ शकते.

## लाडक्या बहिणींचा ... लाडका भाऊ (मुख्यमंत्री)

(छाया – मनोज सिंह / राम सिंग)



■ कुठल्याच नात्यात नसेल एवढी बहिण भावाचच्या प्रेमात ओढ आहे... म्हणुनच भाऊ बहिणीच हे नात जगात खुप-खुप गोड आहे... रक्षाबंधनाच्या तुम्हा सर्वांना हार्दिक शुभेच्छा...!



**सण रक्षाबंधनाचा....** धर्मवीर आनंद दिघे साहेब यांचा वसा पुढे घेऊन जात काल (सोमवारी) ठाण्यातीलटेंभी नका येथील आनंद आश्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हजारो बहिणींच्या हस्ते राखी बांधून घेत रक्षाबंधनाचा सण साजरा केला. यावेळी ठाणे, कळवा, मुंब्रा, दिवा इत्यादी ठिकाणच्या महिला भगिनी राखी बांधण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी लहानांपासून ते पोलीस कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वांनी मुख्यमंत्र्यांना राख्या बांधल्या. ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेच्या माध्यमातून प्रत्येक महिलेच्या खात्यात दोन महिन्याचा हप्ता म्हणून प्रत्येकी तीन हजार रुपये जमा करण्यात आले. त्यामुळे यंदाचा रक्षाबंधनाचा सण खास बनला आहे. याप्रसंगी खासदार नरेश म्हस्के, ठाणे जिल्हा महिला संघटिका मीनाक्षी शिंदे, विधानसभा प्रमुख हेमंत पवार, माजी नगरसेवक राम रेपाळे, विकास रेपाळे, माजी नगरसेविका सौ.नम्रता भोसले जाधव, टेंभीनाका शिवसेना शाखाप्रमुख निखिल बुडजडे, उपविभागप्रमुख स्वानंद पवार तसेच शिवसेनेचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि लाडक्या बहिणी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

# लाडक्या बहिणींना लखपती बनवायचंय!

**ठाणे – महाराष्ट्रातील प्रत्येक महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे महायुती सरकारने ठरविले आहे. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलेला ‘लखपती दीदी’ बनविण्याचे ध्येय ठेवले आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातील महायुती सरकारला लाडक्या बहिणींनाही लखपती बनवायंच, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी येथे दिली.**

राज्यातील महिला सक्षमीकरणासाठी महायुती सरकारकडून लाडकी बहीण योजना यशस्वीपणे राबविली जात आहे. या योजनेचा ३ हजार रुपयांचा पहिला हप्ता नोंदणीकृत बहिणींच्या खात्यातही जमा झाला. महायुती सरकारने ही राज्यातील बहिणींना दिलेली रक्षाबंधनाची ही भेट ठरली. या पार्श्वभूमीवर भाजपा महिला मोर्चाने अंधेरी येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कार्यक्रमातून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाण्यातील महिलांबरोबर व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला.

### देवेंद्र फडणवीस यांनी साधला ठाण्यातील बहिणींबरोबर संवाद




लाभार्थी बहीणी ज्योती गिरी व रुपा केळकर यांनी ना. फडणवीस यांच्याकडे भावना व्यक्त केल्या. त्यावेळी प्रत्येक महिलेला लखपती बनविण्याचे ध्येय ठेवले असून, आम्ही बहिणींना लखपती बनवू, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. भाजपा ठाणे व महिला मोर्चाच्या वतीने ठाण्यातील महाजनवाडी येथील सभागृहात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (पान २ वर)



### पोलीस भरतीत ३,९२४ पदांसाठी पावणेतीन लाख महिलांचे अर्ज

मुंबई : राज्यात महिला पोलीस भरतीसाठी यावेळी ३९२४ पदांसाठी पावणेतीन लाखांहून अधिक महिलांनी अर्ज केले आहेत. त्यापैकी एक लाखाहून अधिक महिला उमेदवार उच्चशिक्षित आहेत. मुंबईला सर्वाधिक पसंती असून एक लाखांहून अधिक महिलांनी मुंबई पोलीस दलातील भरतीसाठी अर्ज केले आहेत. राज्य पोलीस दलातील १७ हजार ४७१ पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू आहे. त्यासाठी १६ लाख ८८ हजार ७८५ अर्ज प्राप्त झाले आहेत. राज्यातील पोलीस शिपाई व चालकांच्या एकूण पदांपैकी ३० टक्के पदे महिलांसाठी आरक्षित आहेत. राज्यभरात एकूण ३९२४ पदे महिला उमेदवारांसाठी उपलब्ध आहेत. (पान २ वर)

- एकूण १६,८८,७८५ अर्जांपैकी २,७८,८२९ महिला अर्जदार आहेत.
- पोलीस शिपाई : रिक्त पदे ९५९५ एकूण अर्ज ७,८२,७९६, महिला अर्जदार १,७१,७६१
- चालक : रिक्त पदे १६८६ एकूण अर्ज १,८३,०७०, महिला अर्जदार १५,६०९
- कारागृह शिपाई : रिक्त पदे १८०० एकूण अर्ज ३,६१,४८३, महिला अर्जदार ८५,८०३

**थोडक्यात घडामोडी**

### हॉस्पिटल आणि हॉस्टेलमध्ये डिलिव्हरी बॉयला नो एंट्री

कोलकात्यात निवासी डॉक्टरवर झालेल्या बलात्कार आणि हत्येच्या घटनेनंतर निवासी डॉक्टरांच्या सुरक्षेचा मुद्दा देशभर गाजतोय.. अशातच मुंबई महापालिका प्रशासनाने अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतलाय. महापालिका प्रशासनाने रुग्णालयात कार्यरत सुरक्षा विभागातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी रुग्णालयांत आणि हॉस्टेलमध्ये खाद्यपदार्थांची डिलिव्हरी करणाऱ्या व्यक्तींना किंवा फूड डिलिव्हरी बॉयला एण्ट्री देऊ नये, अशी सूचना देण्यात आली. त्यामुळे डॉक्टरांसह कुणीही हॉस्पिटल आणि कॉलेजच्या आवाराबाहेरून खाद्यपदार्थ ऑर्डर केल्यास ते मुख्य प्रवेशद्वारावर जाऊन घ्यावे लागणारेत..

### पेंग्विनचा देखभाल खर्च वाढला

मुंबईतील भायखळ्याच्या वीरमाता जिजाबाई भोसले उद्यानातील पेंग्विन पक्षांच्या देखभालीचा खर्च यंदा आणखी वाढलाय. पेंग्विनच्या देखभालीसाठी तब्बल २० कोटी खर्चासाठी निविदा मागवण्यात आल्यात. पेंग्विनची संख्या गेल्या ६ वर्षात ७ वरून १८ वर गेलीय. पेंग्विनची संख्या वाढल्यानं त्यांचा देखभालीचाही खर्च वाढलाय.

### पंढरपुरात पवार गट आणि शिंदे गटात राडा

पंढरपुरात शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गटातील कार्यकर्त्यात तुफान हाणामारी झालीय. टाकळी गावात हा प्रकार घडलाय. शिवसेना शिंदे गटाचे नेते महेश साठे आणि त्यांचा भाऊ संजय साठेंनी धारदार शस्त्रानं वार करत मारहाण केल्याचा आरोप राष्ट्रवादी शरद पवार गटानं केलाय.. तसेच मारहाणीत ७–८ कार्यकर्ते जखमी झाल्याचा आरोपही संदीप मांडवेंनी केलाय.. जखमी कार्यकर्त्यांवर रुग्णालयात उपचार सुरू असून टाकळी गावातील परिस्थिती तणावाची असल्याचं माहिती आहे.

### झिशान सिद्दिकी अजित पवार गटाच्या वाटेवर?

काँग्रेसचे आमदार झिशान सिद्दिकी अजित पवार गटाच्या वाटेवर असल्याची चर्चा सुरू आहे. अजित पवारांच्या जनसन्मान यात्रेची झिशान सिद्दिकी यांच्याकडून जय्यत तयारी सुरू आहे. बांद्रा पूर्व या मतदारसंघांमध्ये ठिकठिकाणी या यात्रेचे बॅनर्स झळकले आहेत. बाबा सिद्दिकी यांनी मागच्या वर्षी अजित पवार गटामध्ये पक्षप्रवेश केला होता. आता झिशान सिद्दिकी पक्षाला सोडचिट्टी देणार असल्याची चर्चा सुरूये. ते जनसन्मान यात्रेची तयारी करत असल्यानं आता काँग्रेस त्यांच्यावर काय कारवाई करणार? याकडे सर्वांचं लक्ष लागून आहे.









# कोळी बांधवांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात साजरा झाला नारळी पौर्णिमा उत्सव!

ठाणे, १९ : ठाणे महानगरपालिका आयोजित नारळी पौर्णिमेचा सण आज ठाण्यातील कोळी बांधवासमवेत उत्साहात साजरा करण्यात आला. पारंपरिक वेशभूषेत कोळी बांधव या उत्सवात सहभागी झाले होते.

यावेळी माजी उपमहापौर पल्लवी कदम, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी, प्र. उपमाहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर तसेच महापालिका कर्मचारी उपस्थित होते.

कळवा खारटन रोड येथे उभारण्यात आलेल्या व्यासपीठावर कोळी बांधवांनी पालखीचे विधीवत पूजन केले, तसेच समुद्राला अर्पण करण्यात येणा–या नारळाचे पूजन करून कळवा विसर्जन घाटापर्यंत वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत कोळी बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कळवा विसर्जन घाट येथे पालखीची मनोभावे पूजा करुन पालखीतील नारळ कळवा खाडी येथे अर्पण करण्यात आले.

नारळी पौर्णिमा हा कोळी बांधवांचा पारंपरिक सण. दर्याला नारळ अर्पण करून कोळी बांधव मासेमारीस सुरूवात करतात. दरवर्षी ठाणे महापालिकेच्या माध्यमातून हा नारळी पौर्णिमा उत्सव साजरा केला जातो या बद्दल कोळी बांधवांनी महापालिकेचे आभार व्यक्त केले. यावेळी पारंपारिक कोळी नृत्याच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## महायुतीतील वाद मिटवा

विधानसभेची निवडणूक तोंडावर आली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने सध्या राज्यातील विधानसभा निवडणुकीची घोषणा केली नसली तरी काही दिवसात घोषणा होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी जनसंपर्क वाढवून कंबर कसली आहे. अनेक नेत्यांचे राज्यात दौरे सुरु आहेत. या दौऱ्यांच्या माध्यमातून निवडणुकीचा आढावा घेतला जात आहे. यातच सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. मात्र, आता महायुतीमध्येही धुसफूस सुरु झाल्याची चर्चा रंगली आहे. शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्यावर केलेल्या टीकेनंतर महायुतीमधील धुसफूस चव्हाट्यावर आली आहे. महायुतीत सर्व काही आलबेल वाटत असले तरी अस्वस्थता सुरू असल्याचे दिसते. याचा परिणाम आगामी विधानसभा निवडणुकीवर होणार असल्याचे दिसते. शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी म्हटले आहे की, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी रविंद्र चव्हाण यांचा राजीनामा घेतला पाहिजे. तसेच ते अत्यंत कुचकामी मंत्री आहेत, अशी टीका रामदास कदम यांनी केली आहे. त्यांच्या या विधानावर आता देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे की, रामदास कदम वारंवार टोकाचे बोलतात, आमचेही मन दुखावले जाते. मग आम्हालाही ५० गोष्टी बोलता येतील, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी रामदास कदम यांना खडेबोल सुनावले आहेत. भाजपाचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी रामदास कदम यांना प्रतिटोला दिल्यामुळे महायुतीत सर्व काही योग्य चालले नसल्याचे दिसून येते. तसेच महायुतीमधील पक्षांमध्ये एकवाक्यता नसल्याचेही दिसून येते. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीवर याचा मोठा परिणाम दिसून येणार आहे. रामदास कदम हे वारंवार अशा पद्धतीने टोकाचे बोलतात. त्यामुळे आमची मनेही दुखावली जातात. शेवटी आम्हीही माणसे आहोत. पण जे मोठे नेते आहेत, त्यांनी काहीतरी पथ्य पाळले पाहिजे. भारतीय जनता पक्षाला वारंवार अशा प्रकारचे बोलणे आम्हाला मान्य नाही. याबाबत मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी बोलेन, असे सूचक वाक्य देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्यावर केलेल्या टीकेनंतर महायुतीमधील धुसफूस चव्हाट्यावर आली आहे. निवडणूक तोंडावर आलेली आहे. त्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी कंबर कसली आहे. अनेक नेत्यांचे राज्यात दौरे सुरु आहेत. या दौऱ्यांच्या माध्यमातून निवडणुकीचा आढावा घेतला जात आहे. यातच सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. मात्र, आता महायुतीमध्येही धुसफूस सुरु झाल्याची चर्चा रंगली आहे. रामदास कदम यांच्या विधानावर देवेंद्र फडणवीस यांनी रोखठोक प्रतिक्रिया दिली आहे. कदम टोकाचे बोलत असतील तर आम्हालाही तुम्हाला बोलण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत, असा इशारा फडणवीस यांनी कदम यांना दिला आहे. राज्यात मराठा आरक्षणाला आरक्षण न मिळण्यास भाजपा जबाबदार आहे असे वक्तव्य काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी केले होते. जरांगे यांच्या विधानानंतर फडणवीस व्यथित झालेले दिसले. फडणवीस यांनी असे म्हटले होते की, मी जर कोणत्या गोष्टीत कमी पडलो असेल तर मी राजीनामा देईन. त्यामुळे फडणवीसांना मराठा आंदोलकांकडून लक्ष्य करण्यात येत आहे. असे असताना महायुतीतील शिवसेना शिंदे गट पक्षातील एका नेत्याने भाजपाचे नाव घेऊन टीका केल्यामुळे फडणवीस यांनी रोखठोक उत्तर दिले आहे असे दिसते.फडणवीस यांनी कदम यांचे नाव न घेता म्हटले आहे की, जे मोठे नेते आहेत, त्यांनी काहीतरी पथ्य पाळले पाहिजे. भारतीय जनता पक्षाला वारंवार अशा प्रकारचे बोलणे योग्य नाही. देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विरोधकांवरही टीका केली आहे. रामदास कदम रवींद्र चव्हाण यांच्यावर टीका करताना म्हटले होते की, मुंबई-गोवा मार्गावर खड्डे पडले आहे. परंतु चमकोगिरी करण्यासाठी पाहाणी दौरा केला जात आहे. हे पाहणी दौरे कशासाठी? खरेतर सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांचा राजीनामा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी घ्यायला हवा, अशी टीका रामदास कदम यांनी महायुतीला घरचा आहेर दिला आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील खड्ड्यांवरून रामदास कदम यांनी मंत्री रवींद्र चव्हाण यांच्यावर टीका केल्यानंतर संतप्त झालेल्या सार्वजनिक बांधकाम मंत्री चव्हाण यांनी कदम यांना प्रत्युत्तर दिले होते. ते म्हणाले की, गेल्या ४० वर्षांच्या काळात रामदास कदम आमदार, मंत्री म्हणून कोकणाचे नेतृत्व करत आहेत. त्यांनी या काळात विकास कामे सोडाच, पण इतर विकास कामांचे कोणते दिवे लावले ते पहिले स्पष्ट करावे. त्यानंतर हा महायुतीतील नेत्यांचा वाद पेटला आहे असे दिसते.

# 'प्रो गोविंदा'च्या माध्यमातून गोविंदा खेळ जगभरात पोहचल्याचा आनंद - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई, : - प्रो गोविंदा लीगच्या माध्यमातून १०० वर्षांची परंपरा असलेला गोविंदा हा खेळ जगभरात पोहचल्याचा आनंद असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. वरळी येथील एन.एस. सी.आय.डोम येथे आयोजित प्रो गोविंदा लीगच्या बक्षीस वितरण समारंभ प्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.**







यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, मिलिंद देवरा, आमदार प्रताप सरनाईक, मोहम्मद दुराणी, पुर्वेश सरनाईक आदिंसह स्पर्धांचे आयोजक, संघ मालक, गोविंदा पथक उपस्थित होते.

खेळामध्ये स्पर्धा असली पाहिजे, पण ती जीवघेणी नसावी. त्यामुळे यंदा आपण सर्वांनी अपघातमुक्त गोविंदा उत्सव साजरा करूया असे आवाहन करून मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, स्वातंत्र्यपूर्व काळापासून हा खेळ सुरू आहे. या खेळाचा समावेश साहसी क्रीडा प्रकारामध्ये करण्यात आला आहे. या ठिकाणी अनेक गोविंदा उपस्थित आहेत. या गोविंदांच्या विमा संरक्षणाची जबाबदारी शासनाने घेतली आहे. यंदाच्या वर्षी ७५ हजार गोविंदांचा विमा उतरविण्यात आला आहे. भविष्यात हा खेळ ऑलिंपिकमध्ये सहभागी करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यंदा आपण ६० गोविंदांना स्पेनला पाठवतो आहोत.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, खेलो इंडियाच्या माध्यमातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी खेळाला प्रोत्साहन दिले आहे. त्यामुळेच आपण ऑलिंपिकमध्ये ६ पदक जिंकली आहेत. त्यामध्ये कोल्हापूरच्या स्वप्नील कुसाळे याचाही समावेश असल्याचा अभिमान आहे.


शासन युवक आणि युवतींच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. आता लाडकी बहीण प्रमाणेच लाडका भाऊ योजना आणली आहे. कौशल्य विकासच्या माध्यमातून युवक युवतींना प्रशिक्षण देण्यात येत आहे. प्रशिक्षणार्थींना मानधन देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. युवक युवतींनी याचा लाभ घ्यावा असे आवाहनही मुख्यमंत्री शिंदे यांनी केले.

या स्पर्धांमध्ये एकूण ३२ संघ सहभागी झाले होते. त्यापैकी १६ संघांनी आजच्या अंतिम फेरीत आपले कौशल्य सादर केले. यंदाच्या वर्षी सातारा सिंघम यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सातारा येथील नवीन शासकीय विश्रामगृहाचे उद्घाटन



सातारा, : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सातारा येथील नवीन शासकीय विश्रामगृहाचे उद्घाटन केले. यावेळी त्यांनी नवीन शासकीय विश्रामगृह सर्व सोयी सुविधेसह सज्ज ठेवावे, असे निर्देश दिले.





सातारा येथील नवीन बांधण्यात आलेल्या शासकीय विश्रामगृहाचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. पालकमंत्री शंभूराज देसाई, आमदार सर्वश्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पोलीस अधीक्षक समीर शेख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री शिंदे यांनी नवीन विश्रामगृहाच्या इमारतीची पाहणी केली.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, सातारा शहरातील सदर बाजार येथील ही एक देखणी वास्तू निर्माण झाली आहे. या ठिकाणचा परिसर स्वच्छ ठेवावा आणि इमारतीची देखभाल योग्य करावी, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

### असे आहे नवीन शासकीय विश्रामगृह

सातारा येथील शासकीय विश्रामगृहाचे विस्तारीकरण करण्यात आले असून या ठिकाणी नवीन विश्रामगृह बांधण्यात आले आहे. यासाठी १३ कोटी १२ लाख ७६ हजार १९४ रुपये खर्च आला. यामध्ये मल्टीपर्पज हॉल, साधारण कक्ष-५, डायनिंग व किचन, स्वागत व प्रतिक्षा कक्ष, एव्ही रुम, पैंट्री, स्टोअर रुम, व्हीव्हीआयपी सुट-१ व्हीआयपी सुट २ कॉन्फरन्स रुम व स्टोअर रुमसह आकर्षक विद्युत रचना, प्रोजेक्टर, ऑडियो व्हिडिओ सिस्टीम, अद्यावत फर्निचर, सर्व रुममध्ये टेलिव्हिजन आदी सुविधा उपलब्ध आहेत.

# महाराष्ट्र शासनाची मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अंतर्गत भिवंडी पालिकेत १५ लाभार्थ्यांना नियुक्तीपत्र...





भिवंडी - महाराष्ट्र शासनाची मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अंतर्गत भिवंडी महापालिकेतील विविध पदांकरीता रिक्त जागेवर तात्पुरत्या स्वरूपात शिकाऊ कर्मचारी यांच्या नियुक्तीस सुरूवात झाली आहे. याकरीता ऑन लाईन व ऑफ लाईन यांधून अर्ज प्राप्त झालेल्या अर्जांमधून छाननी करण्याचे काम करण्यात सुरू आहे, आज पालिका आयुक्त अजय वैद्य यांच्या हस्ते १५ लाभार्थी यांना कामाच्या नियुक्तीचे आदेश देण्यात आले. यामध्ये कनिष्ठ अभियंता बांधकाम स्थापत्य, पाणी पुरवठा यातील ०७, लिपिक ०३, संगणक साफ्टवेअर इंजीनिअर ०३ पदे, उप समाज विकास अधिकारी ०१ असे एकूण १५ नियुक्तीपत्र पालिका आयुक्त अजय वैद्य यांच्या हसते वाटप करण्यात आली. पालिकेत एकूण २०३ जागांची भरती या अंतर्गत करण्यात येणार आहे. छाननी प्रक्रीया सुरू आहे. आज १५ करर्मचारी यांना आदेश देण्यात आले, उरलेले आदेशांची कागदपत्रांची पुर्तता करून एक ते दोन दिवसांत करून सदरचे कामाचे आदेश देण्यात येतील अशी माहिती पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी दिली. पालिका आयुक्त यांच्या दालनात झालेल्या कार्यक्रमात या वेळेला पालिका अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, समाज कल्याण विभागाच्या उपायुक्त डॉक्टर अनुराधा बाबर, समाज कल्याण विभाग प्रमुख नितेश चौधरी उपस्थित होते







राज्यातील महिला सक्षमीकरणासाठी महायुती सरकारकडून लाडकी बहीण योजना यशस्वीपणे राबविली जात आहे. या योजनेचा ३ हजार रुपयांचा पहिला हप्ता नोंदणीकृत बहिणींच्या खात्यातही जमा झाला. महायुती सरकारने ही राज्यातील बहिणींना दिलेली रक्षाबंधनाची ही भेट ठरली. या पार्श्वभूमीवर काल सोमवारी श्री. जयेंद्र चिंतामण कोळी, अध्यक्ष आई-बाबा सामाजिक संस्था, यांचे माता रमाबाई चौक, नागसेन नगर, किसन लक्ष्मण कोळी मार्ग, ठाणे पश्चिम येथील कार्यालयात विविध सामाजातील महिला भगिनींनी औक्षण करीत बहिण योजनेबद्दल राखी बांधून युती सरकारचे आभार व्यक्त केले.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
ठाणे विभाग, ठाणे
३ रा ते ६ वा मजला
वेस्ट व्ह्यू बिल्डींग, राम मारुती रोड,
ठाणे (प) - ४००६०१

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांकः ध उ आ / ५५० / २०२४
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक: प्रताप व्यायामशाळा सेवा संस्था
न्यास नोंदणी क्र. ई/४४५ /ठाणे

अर्जदार : **श्री. महेश भास्कर जोशी**

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मा. धर्मादाय उपायुक्त, ठाणे विभाग, ठाणे हे वर नमूद केलेल्या बदल अर्जासंबंधी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम २२ प्रमाणे खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

**Following Property is to be registered on records.**

**SCHEDULE OF PROPERTY**

ALL THAT PREMISES being Basement, admeasuring 1665 Sq. ft. carpet area, together with the right to use the open space, admeasuring 706.25 Sq. ft. on the southern side of the building for its exclusive use of parking, in RAM SHANTI Co-operative Housing Society Ltd, constructed in the year 1999 vide Occupation Certificate V. P. No 95 / 143/TMC / TDD/443 Dated 28.05.1999.
Property situated on a plot of land bearing Tika No. 15, CTS No. 43/10 & 43 / 11, lying being and situated at Ghantali Road, Village Naupada, Thane, Taluka & District Thane, within the Registration District & Sub-District of Thane and within the limits of Thane Municipal Corporation.
Bounded as follows:
On or towards East: Ghantali Mandir Road
On or towards West: Property of Shri Naidu
On or towards South: Rachana CHS Ltd.
On or towards North: Property of Shri Bhatt
**Value of the Property:**
**Rs. 0.00/- As the said property is received via gift for the trust.**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यायची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्याची लेखी कैफियत, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उपायुक्त, ठाणे विभाग, ठाणे यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १९/०८/२०२४ रोजी दिली.

सही/-
अधीक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
ठाणे विभाग, ठाणे

## डिसेंबर महिन्यात मतदान?

**(पान १ वरून)** राज्यात नियमानुसार नवी विधानसभा २६ नोव्हेंबर २०२४ पर्यंत अस्तित्वात येणे अपेक्षित आहे. मात्र, महायुती सरकारच्या 'लाडकी बहीण' योजनेमुळे निवडणूक लांबणीवर पडली असल्याची चर्चा आहे. निवडणूक आयोगाने नुकताच हरियाणा आणि जम्मू-काश्मीरमधील विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला होता. तेव्हाच महाराष्ट्रातील निवडणूक लांबणीवर पडेल, असे संकेत मिळाले होते. त्यामुळे राज्यातील विधानसभा निवडणूक नोव्हेंबर महिन्यात होईल, असा अंदाज होता. दिवाळीचा सण आटोपल्यानंतर मतदान पार पडेल आणि १५ ते १६ नोव्हेंबरपर्यंत निकाल जाहीर होईल. जेणेकरून २६ नोव्हेंबरपूर्वी नवी विधानसभा अस्तित्वात येईल, असा अंदाज होता. मात्र, आता निवडणूक आयोग महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक डिसेंबर महिन्यात घेईल, अशी माहिती समोर आली आहे. या काळात महायुती सरकारला लाडकी बहीणसह अन्य योजनांचा पुरेपूर प्रचार करण्यास वेळ मिळेल. यावर महाविकास आघाडी याबाबत काय भूमिका घेणार, हे पाहावे लागेल.

## लाडक्या बहिणींना लखपती बनवायचंय!

**(पान १ वरून)** यांच्याबरोबर संवाद साधण्यासाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमाला शेकडो ठाणेकर बहिणींची उपस्थिती होती. या वेळी आमदार निरंजन डावखरे, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, माजी उपमहापौर मिलिंद पाटणकर, माजी नगरसेवक संदीप लेले, सुनील हंडोरे, राजकुमार यादव, माजी नगरसेविका अर्चना मणेरा, कविता पाटील, कमल चौधरी, नम्रता कोळी, नंदा पाटील, मृणाल पेंडसे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा स्नेहा पाटील, भाजपाचे शहर उपाध्यक्ष जयेंद्र कोळी आदींची उपस्थिती होती.

महाराष्ट्रातील प्रत्येक महिलेचे आर्थिक जीवन समृद्ध करण्यासाठी महायुती सरकार प्रयत्न करीत आहे. लाडकी बहीण योजनेंतर्गत दरमहा १५०० रुपये दिले गेले. तर वार्षिक तीन गॅस सिलिंडर मोफत मिळणार आहेत. लेक लाडकी योजनेतून मुलींना १८ वर्ष झाल्यावर १ लाख रुपये मिळणार आहेत. एस. टी. मध्ये अर्ध्या तिकिटात प्रवास करता येत आहे. लाडक्या बहिणींना भक्कम आधार दिला जात आहे, अशी ग्वाही देवेंद्र फडणवीस यांनी ज्योती गिरी यांच्या प्रतिक्रियेवर व्यक्त केली. संसार सांभाळू शकणारी स्त्री जगालाही सांभाळू शकते, अशा शब्दात श्री. फडणवीस यांनी महिलांचा गौरव केला. या कार्यक्रमाला शहरातील महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. महाजनवाडी हॉल खच्चून भरला होता.

## पोलीस भरतीत ३,९२४ पदांसाठी पावणेतीन लाख महिलांचे अर्ज

**(पान १ वरून)** या पदांसाठी दोन लाख ७८ हजार ८२९ महिला उमेदवारांनी अर्ज केले आहेत. म्हणजे प्रत्येक पदासाठी किमान ७१ महिला उमेदवारांमध्ये स्पर्धा आहे. राज्यात सर्वाधिक पसंती मुंबई विभागाला आहे. मुंबईत १२५७ पदांसाठी मैदानी परीक्षा सुरू आहे. त्यासाठी सुमारे एक लाख १० हजार महिला उमेदवारांनी अर्ज केले आहेत. दोन - तीन ठिकाणी अर्ज करणाऱ्या उमेदवारांची संख्या अधिक आहे. त्यात अनेकांनी मुंबईला पहिली पसंती दिल्यामुळे तुलनेने येथे अधिक अर्ज आले आहेत, असे अधिकाऱ्याने सांगितले. पोलीस भरती प्रक्रियेसाठी राज्यातील ६६ केंद्रांपैकी २२ केंद्रांमध्ये लेखी परीक्षा घेण्यात आली आहे. मिरा - भाईंदर, छत्रपती संभाजी नगर शहर, नवी मुंबई, सोलापूर शहर, नाशिक शहर, अमरावती शहर, मुंबई लोहमार्ग, पालघर, सांगली, नाशिक ग्रामीण, अहमद नगर, धुळे, जळगाव, छत्रपती संभाजी नगर ग्रामीण, बीड, जालना, यवतमाळ, लातूर, वाशीम, भंडारा, वर्धा व पुणे लोहमार्ग या २२ पोलीस आयुक्तालय आणि पोलीस अधीक्षक कार्यालयांचा समावेश आहे. पावसामुळे मुंबईमध्ये वेळेवर मैदान उपलब्ध न झाल्यामुळे अद्याप मैदानी परीक्षेची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे ती सध्या तीन ठिकाणी सुरू असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

**मिरा भाईंदर महानगरपालिका**
स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय,भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८/२८१९३०८७
Email :- pro@mbmc.gov.in
माहिती व जनसंपर्क विभाग
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/मावज/E- २६१२२४२/२०२४-२५ दि. १९/०८/२०२४

**// मुदतवाढ //**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने दि. ०७/०८/२०२४ रोजीच्या पुढारी नवशक्ती व महाराष्ट्र सम्राट या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली फेर-निविदा सुचना क्र. १५ (२०२४-२५) (2024_MBMC_1067248_1) या कामाकरीता निविदा स्विकारण्याची वेळ दि. १६/०८/२०२४ रोजी दुपारी १.०० पर्यंत देण्यात आली होती. सदर कामाकरीता निविदा स्विकारण्याची वेळ वाढवून दि. २३/०८/२०२४ रोजी दुपारी १.०० पर्यंत करण्यात येत आहे. तसेच सदर निविदेची तांत्रिक बिड दि. २६/०८/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता उघडण्यात येतील.
इतर मजकूरात बदल नाही.

जा. क्र. मनपा/मावज/ई २६१२२४२/२४-२५
दि. १९/०८/२०२४

सही/-
(दिपक अभियंता)
शहर अभियंता
मिरा-भााईंदर महानगरपालिका

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय
छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय
निविदा सूचना

ठाणे महानगर पालिकेच्या राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय येथील डॉक्टर मेस /उपहारगृह चालविण्यासाठी अल्पदरात खाद्यपदार्थ भोजन पुरविणेसाठी पुरवठादाराची नियुक्ती करणेबाबत निविदा मागविणेसाठी ऑन लाईन ई - टेडरिंग पद्धतीने निविदा महानगरपालिकेच्या नियमानुसार राज्यस्तरिय व स्थानिक पातळीवरुन प्रसिद्ध होणार्या वर्तमानपत्रातुन प्रसिद्ध करण्यात यावी. निविदा सूचना व प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in दि.२०/०८/२०२४ ते दि.२९/०८/२०२४ रोजी पर्यंत १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील. दि.२९/०८/२०२४ रोजी १६.३० वाजेपर्यंत ऑनलाइन निविदा स्वीकारण्यात येतील. दि.०४/०९/२०२४ रोजी १६.०० वाजता स्वीकारलेल्या निविदा ऑनलाइन उघडण्यात येतील. ठाणे महानगर पालिका कोणतेही कारण न देता आलेल्या निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचे अधिकार राखून ठेवत आहे.

ठामपा/पिआरओ/ अधिष्ठाता/ ३१६/ २०२४-२५ **सही/-**
दि : १९/०८/२०२४ अधिष्ठाता
**Pls visit our oficial web-site** छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय व
**www.thanecity.gov.in** राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय

## भारतीय सैन्य दल

■ पदाचे नाव तपशील:
पद क्र. पदाचे नाव पद संख्या
१ हवालदार - २ नायब सुभेदार -

■ क्रीडा पात्रता: ॲथलेटिक्स, तिरंदाजी बास्केटबॉल बॉक्सिंग, डायव्हिंग, फुटबॉल, तलवारबाजी, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, हँडबॉल, कबड्डी. ज्यांनी वर नमूद केलेल्या कोणत्याही खेळ आणि खेळांमध्ये खालीलप्रमाणे प्रतिनिधित्व केले आहे:- (E) व्यक्ती राष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्याचे प्रतिनिधित्व करून कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर पदक विजेता असावी किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर (इंडल इव्हेंट) देशाचे प्रतिनिधित्व केले असेल. (ab) व्यक्तीने कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर (सांघिक स्पर्धा) राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्य किंवा देशाचे प्रतिनिधित्व केलेले असावे. (ac) वैयक्तिक खेळो इंडिया गेम्स आणि युथ गेम्समध्ये पदक विजेता असावा.

■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.१: १०वी उत्तीर्ण
पद क्र.२: १०वी उत्तीर्ण

■ वयाची अट: जन्म ०१ ऑक्टोबर १९९९ ते ३० सप्टेंबर २००६ दरम्यान झालेला असावा.

■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: Directorate of PT Sports General Staff Branch IHQ of MoD (Army) Room No 747 "A' Wing, Sena Bhawan PO New Delhi -110 011

■ अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४

■ वेबसाईट https://www.indianarmy.nic.in/

## महाराष्ट्र राज्य नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

■ जाहिरात क्र.: ०१/२०२४
■ जागा : २८९
■ पदाचे नाव :
१ रचना सहायक (गट ब)
२ उच्चश्रेणी लघुलेखक (गट ब)
३ निम्न श्रेणी लघुलेखक (गट ब)

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: स्थापत्य किंवा ग्रामीण आणि स्थापत्य/नागरी व ग्रामीण किंवा वास्तुशास्त्र किंवा बांधकाम तंत्रज्ञान डिप्लोमा
पद क्र.२: (i) १०वी उत्तीर्ण उत्तीर्ण (ii) लघुलेखन १२० श.प्र.मि. (iii) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.
पद क्र.३: (i) १०वी उत्तीर्ण उत्तीर्ण (ii) लघुलेखन १०० श.प्र.मि. (iii) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.

■ वयाची अट: २९ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते ३८ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : खुला प्रवर्ग: १०००/- मागासवर्गीय: ९००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २९ ऑगस्ट २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://dtp.maharashtra.gov.in/

## भारतीय रेल्वे

■ जागा : ७९५१
■ पदाचे नाव :
१ केमिकल सुपरवाइजर/रिसर्च
२ मेटलर्जिकल सुपरवाइजर/रिसर्च
३ ज्युनियर इंजिनिअर
४ डेपो मटेरियल सुपरिटेंडंट
५ केमिकल मेटलर्जिकल असिस्टंट




■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: केमिकल टेक्नोलॉजी पदवी.
पद क्र.२: मेटलर्जिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.३: इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics/ Civil/ Mechanical / Production / Automobile / Instrumentation and Control / Manufacturing / Mechatronics / Industrial / Machining / Tools and Machining / Tools and Die Making / Automobile / Information Technology / Communication Engineering / Computer Science and Engineering / Computer Science / Computer Engineering)
पद क्र.४: कोणत्याही विषयातील इंजिनिअरिंग डिप्लोमा.
पद क्र.५: ४५% गुणांसह B.Sc (Physics/Chemistry)

■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी १८ ते ३६ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: 500/- SC/ST/ExSM²/ट्रान्सजेंडर/EBC/महिला: २५०/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २९ ऑगस्ट २०२४
■ अर्ज दुरुस्ती: ३० ऑगस्ट ते ०८ सप्टेंबर
■ वेबसाईट https://indianrailways.gov.in/

मुलींच्या अत्याचाराप्रकरणी

# मुख्याध्यापिकेसह चौघांचे निलंबन, शाळेचा माफीनामा

बदलापूर: बदलापूर पूर्व येथील एका नामांकित शाळेत दोन चिमूरड्यांवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणावरून स्थानिक पोलीस आणि शाळा प्रशासनावर टीकेची झोड उठवली जात असतानाच आता शाळेने माफीनामा जाहीर केला आहे. याप्रकरणी शाळेतील संबंधित मुख्याध्यापिकेला निलंबित करण्यात आले असून मुलांची जबाबदारी असलेल्या दोन सेविकांना सेवेतून कमी करण्यात आले आहे. मंगळवारी सजग नागरिकांनी शाळेविरुद्ध आंदोलनाचा निर्णय घेतला आहे. स्थानिक आमदार किसन कथोरे यांनी याप्रकरणी देवेंद्र फडणवीस यांना हा खटला फास्टट्रॅकवर चालवण्याची मागणी केली आहे. तर शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी याप्रकरणी कठोर पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत. तर यात हलगर्जीपणा करणाऱ्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक शुभदा शितोळे यांची उचलबांगडी करण्यात आली आहे.

### मंगळवारी आंदोलन

शहरातील विविध सामाजिक संघटना आणि राजकीय पक्ष या प्रकरणात आक्रमक झाले असून त्यांनी मंगळवारी शाळा प्रशासनाविरुद्ध आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

### खटला फास्टट्रॅकवर चालवा

या प्रकरणावर मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांनी पत्रकार परिषद घेत या प्रकाराचा निषेध केला आहे. यातील आरोपीवर कठोरात कठोर कारवाई होण्यासाठी हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवावा अशी मागणी राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार असल्याचे कथोरे यांनी सांगितले आहे. सोबतच या प्रकरणात पोलीस, शिक्षण संस्था आणि आरोग्य विभागाचे अधिकाऱ्यांनी केलेल्या दुर्लक्षावरही कारवाई करण्याची मागणी कथोरे यांनी केली आहे.

### फाशीची शिक्षा द्या

तर हा निंदनीय प्रकार असून या प्रकरणातील आरोपीला फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी केली आहे. यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देणार असल्याचे ते म्हणाले.

### कठोर कारवाईचे आश्वासन

तर याप्रकरणी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना माहिती दिली असून आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्याशी संपर्क साधून योग्य त्या कडक कारवाईचे निर्देश देण्यात येतील, असे आश्वासन अजित पवार यांनी दिल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस आशिष दामले यांनी दिली आहे.

### वरिष्ठ पोलीस निरीक्षक बदलले

पालकांच्या तक्रारीची वेळीच दखल न घेतल्याचा आरोप बदलापूर पूर्व पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक शुभदा शितोळे यांच्यावर होत होता. त्यानंतर याची दखल राज्याचे मुख्यमंत्री, गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी घेतल्यानंतर शितोळे यांची बदली करण्यात आली असून त्या जागी किरण बालवडकर यांची नेमणूक करण्यात आली आहे.

सबंधित संस्थेने जाहीर केलेल्या माफिनाम्यात या प्रकाराला तो दुर्दैवी, घृणास्पद आणि निंदनीय म्हटले आहे. या प्रकारानंतर सबंधित आरोपी विरुद्ध कारवाई करण्यासाठी पूर्ण क्षमतेने संस्थेने पोलिसांना सहकार्य केले. या घटनेनंतर सबंधित कर्मचाऱ्यावर कठोर शिक्षा व्हावी यासाठी संस्थेचा आग्रह आहे, असे शाळेने निवेदनात म्हटले आहे. आरोपीची हकालपट्टी करण्यात आली असून ज्या खासगी कंत्राटदाराच्या माध्यमातून हा कर्मचारी कंत्राटी पद्धतीने संस्थेच्या सेवेत आला होता. त्या कंत्राटदार कंपनीला कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकून त्याचा करार रद्द केला आहे. तसेच हा प्रकार ज्या ठिकाणी घडला त्या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी असलेल्या मुख्याध्यापिका यांना निलंबित करण्यात आल्याचेही संस्थेने सांगितले आहे. तसेच त्या वर्गाच्या वर्गशिक्षका, मुलांची ने आण सुरक्षितरित्या करण्याची जबाबदारी असणाऱ्या सेविका यांनाही सेवेमधून कमी करण्यात आले आहे. पूर्व प्राथमिक आणि शिशु वर्गाच्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या आणि सांभाळ करण्याच्या दृष्टीने फक्त महिलांचीच नेमणूक केली जाणार आहे. या प्रकरणात पालकांना झालेल्या मनस्तापाबद्दल संस्थेने त्यांची जाहीर माफी मागितली असून त्यांना कायदेशीर मदत देऊ केली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये यासाठी सर्व पालक, विद्यार्थी आणि शहरातील सजग नागरिकांना संस्थेने शांततेचे आवाहन केले आहे. कोणत्याही प्रकारच्या चर्चेसाठी संस्था तयार असल्याचेही संस्थेचे अध्यक्ष उदय कोतवाल यांनी सांगितले आहे.

# अंबरनाथमध्ये भाजपतर्फे मुख्यमंत्री लाडकी योजनेस पात्र महिलांना साड्या भेट

## जीबीके प्रतिष्ठान व रोझ फाउंडेशनचा कार्यक्रम

अंबरनाथ (नवाज वणू) : महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेल्या 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' अंतर्गत गरीब कुटुंबातील महिलांना दरमहा १५०० रुपये मिळणार आहेत. ते थेट तिच्या खात्यात जमा केले जात आहेत. राज्यभरातून लाखो महिला नोंदणी करण्यासाठी कार्यालयाबाहेर रांग लावून अर्ज भरताना दिसत आहेत. दरम्यान या योजनेस पात्र महिलांना अंबरनाथमध्ये भारतीय जनता पार्टी, गुलाबराव करंजुले पाटील प्रतिष्ठान तसेच रोझ फाउंडेशनच्या माध्यमातून अंबरनाथ पूर्व बि-केबीन रोड येथील भाजप जनसंपर्क कार्यालयात भाजप कल्याण जिल्हा सचिव अभिजीत करंजुले पाटील यांच्या नेतृत्वाखाली १८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन सणाच्या पूर्व संध्येला हजारो महिला, अंध, अपंग महिलांना भाजप प्रदेश सरचिटणीस तथा अंबरनाथ विधानसभा निवडणूक प्रमुख गुलाबराव करंजुले पाटील यांच्याहस्ते साडी भेट देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी अपंग बांधवांना टी-शर्टचे वाटप करण्यात आले.




'मुख्यमंत्री लाडकी बहिणी योजनेस पात्र महिलांना जुलै आणि ऑगस्ट या दोन्ही महिन्यांचे ३ हजार रुपये महिलांच्या खात्यात जमा करून बहिणीला राखी पौर्णिमेची ओवाळणी देण्याची घोषणा नव्हे तर प्रत्यक्षात खात्यात रक्कम जमा करून योजनेचा शुभारंभ करण्यात आला आहे. याच अनुषंगाने भारतीय जनता पार्टी कल्याण जिल्हा सचिव अभिजीत करंजुले पाटील व जनसेवक विश्वजीत करंजुले पाटील यांच्या संकल्पनेतून अंबरनाथमधील मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेस पात्र ठरलेल्या महिलांना भारतीय जनता पार्टी, गुलाबराव करंजुले पाटील प्रतिष्ठान व रोझ फाउंडेशनच्या वतीने १८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन पूर्वसंध्येला भाजप जनसंपर्क कार्यालयात भाजपचे प्रदेश सरचिटणीस तथा अंबरनाथ विधानसभा निवडणूक प्रमुख गुलाबराव करंजुले पाटील यांच्याहस्ते महिलांना साडी भेट देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी युवती प्रदेश सचिव रूपाली लट्ठे, महिला मोर्चा शहर अध्यक्ष सुजाता भोईर, अल्पसंख्यांक सेलच्या रोझलीन फर्नांडिस,रीना मोरे, सुनिता लयाल, पूजा रणदिवे, श्रद्धा गुंजाळ, लक्ष्मी राजपूत, अंबरनाथ पूर्व मंडळ अध्यक्ष सर्जेराव माहुरकर, पश्चिम मंडळ अध्यक्ष दुर्वेश राणा, भाजपचे दिलीप कणसे, आप्पा कुलकर्णी, दत्ता देशमुख, संदीप विशे, साईनाथ गुंजाळ, लक्ष्मण पंत, श्रीकांत रेड्डी,राजू गायकवाड, राजेश सिंग, प्रवीण महाजन, अनुराग आचार्य आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भाजप महिलांच्या रक्षणासाठी कटिबद्ध! : गुलाबराव करंजुले पाटील

महाराष्ट्र सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत प्रत्येक लाभार्थी भगिनींच्या खात्यामध्ये थेट पंधराशे रुपये जमा होतात. ते कुठेतरी अधिकारी किंवा पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या हातात जात नाही. त्यामुळे कोणत्याही प्रकारची गळती राहणार नाही. महिना पंधराशे रुपये शासनाने दिले, परंतु आज भारतीय जनता पार्टी अंबरनाथ शहराच्या वतीने गुलाबराव करंजुले पाटील प्रतिष्ठान आणि रोझ फाउंडेशनच्या वतीने या आमच्या लाभार्थी भगिनींना रक्षाबंधन पूर्व संधीला साडी भेट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सणाला प्रत्येक कुटुंब नवीन साडी घेऊ शकत नाही, घेऊ शकते असे असताना सगळ्या भगिनींना साडी भेट देण्याचे ठरवलं. विशेष म्हणजे या रक्षाबंधन सणाचे वैशिष्ट्य असं आहे की, भावानं बहिणीचे रक्षण करावं, त्यांनी आम्हाला राखी बांधली आहे, भारतीय जनता पार्टी सदैव महिलांच्या रक्षणासाठी कटिबद्ध आहे. अशी भावना व्यक्त करत भारतीय जनता पार्टी प्रदेश सरचिटणीस तथा अंबरनाथ विधानसभा निवडणूक प्रमुख गुलाबराव करंजुले पाटील यांनी साडी भेट देताना सर्व महिला भगिनींना रक्षाबंधन सणाच्या शुभेच्छा दिल्या.



माजी नगरसेवक संदीप लेले यांनी नौपाडा पोलीस स्थानकात पोलीस महिला सोबत रक्षाबंधन साजरी केली. (छाया : मनोज सिंह)

## अर्ध्या तासाच्या पावसाने नाशिक जलमय

नाशिक : राज्यात गेल्या काही दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाचे पुनरागमन झाले असून पुणे, नाशिकसह मराठावाडा आणि विदर्भातही पावसाने दमदार हजेरी लावली आहे. नाशिकमध्ये केवळ अर्ध्या तासाच्या पावसाने शहराला झोडपून काढल्याचं पाहायला मिळालं. शहरातील रस्त्यांना आले नद्यांचे रूप आल्याचं दिसून आलं. यावेळी, रस्त्यावरुन पाणी वाहत होतं, त्यातूनच नागरिकांना मार्ग काढवा लागला. तसेच, शहरातील उड्डाणपूल आणि पुलाखाली जाणाऱ्या रस्त्यावर देखील पाणी साचलं होतं. त्यामुळे, नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. नाशिकसह पुणे शहरातही पावसाने जोरदार हजेरी लावली असून हडपसर भागात पावसामुळे पाणीच पाणी झाल्याची परिस्थिती निर्माण झाली. विशेष म्हणजे कालही पुण्यात पावसाची मुसळधार सरी कोसळल्या होत्या. नाशिकमध्ये दुपारच्या सुमारास जोरदार पावसाने हजेरी लावली, केवळ अर्ध्या तास कोसळलेल्या मुसळधारांनी जनजीवन विस्कळीत झालं. दुसरीकडे पुणे शहरातही पावसाचे दमदार आगमन झालं असून हडपसर भागात पाणीच पाणी साचलं होतं. तसेच, वाशिम जिल्ह्यात आज अनेक भागात जोरदार पावसाने हजेरी लावली आहे जोरदार अनेक गर्जना आणि विजेच्या कडकडाटात अर्ध्या तासापासून पावसाची धुव्वाधार बॅटिंग पाहायला मिळाली.

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेसाठी अर्ज करा : रामेश्वर पाचे

**ठाणे : अनुसूचित जाती नव बौद्ध शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना (विशेष घटक योजना) जिल्हा परिषद,ठाणे मार्फत राबविण्यात येत आहे या योजनेचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी रामेश्वर पाचे यांनी केले आहे.**

अनुसूचित जाती नव बौद्ध शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून त्यांचे जीवनमान उंचावण्याच्या उद्देशाने कृषि विभाग, जिल्हा परिषद, ठाणे मार्फत जिल्ह्यामध्ये सन २०२४-२५ करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना राबविण्यात येत आहे.

नवीन विहीर २ लाख ५० हजार रकम्म रु., जुनी विहीर दुरुस्ती ५० हजार रकम्म रु. , इनवेल बोअरिंग २० हजार रकम्म रु., पंपसंच २० हजार रकम्म रु., विज जोडणी आकार १० हजार रकम्म रु., शेततळ्यांचे प्लास्टिक अस्तरीकरण १ लाख रकम्म रु., व सूक्ष्म सिंचन संच अ) ठिबक संच - ५० हजार ब) तुषार संच - २५ हजार या सात बाबींचा लाभ या योजनेअंतर्गत नवीन विहीर पॅकेज (रक्कम रू. ३.३० लाख पर्यंत) असेल. जुनी विहीर दुरुस्ती पॅकेज (रक्कम रु.१.३० लाख पर्यंत) व शेततळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण पॅकेज (रक्कम रु. १.८० लाख पर्यंत) पॅकेज स्वरूपात देण्यात येईल.

या योजनेअंतर्गत सूक्ष्म सिंचन संचाकरिता मंजूर मापदंडानुसार येणाऱ्या खर्चापैकी कमाल ५५% अनुदान प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- प्रती थेंब अधिक पीक या योजनेतून देण्यात येईल व डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना तरतूदीतून १०% पूरक अनुदान असे एकूण ९०% टक्के अनुदान देण्यात येईल.

### योजनेचा लाभ घेण्याकरिता निकष व आवश्यक कागदपत्रे

१) लाभार्थी अनुसूचित जाती / नवबौध्द शेतकरी असला पाहिजे.
२) शेतकऱ्याकडे सक्षम प्राधिकार्याने दिलेले जात प्रमाणपत्र आवश्यक
३) ज्या शेतकऱ्यांना नवीन विहिर या घटकाचा लाभ घ्यावयाचा आहे त्यांना किमान ०.४० हेक्टर शेतजमीन आवश्यक
४) सामूहिक शेत जमीन किमान ०.४० हेक्टर धारण करणारे एकत्रित कुटुंब नवीन विहीर घटकाचा लाभ घेण्यास पात्र असेल.
५) नवीन विहिरी व्यतिरिक्त इतर घटकांचा लाभ घेण्याकरिता किमान ०.२० हेक्टर शेतजमीन आवश्यक
६) या योजनेअंतर्गत कमाल शेत जमिनीची अट ६ हेक्टर आहे.
७)शेतकऱ्याच्या नावे जमीन धारणेचा ७/१२ दाखला व ८ अ उतारा असणे आवश्यक आहे.
८)लाभार्थ्याकडे आधार कार्ड असणे आवश्यक आहे.
९)लाभार्थ्याची बँक खाते आधार कार्डशी संलग्न असणे आवश्यक आहे.
१०) शेतकऱ्याचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न १,५०,००० लाख पेक्षा जास्त नसावे.
११) लाभार्थी योजना अंतर्गत लाभ घेण्यासाठी ग्रामसभेची शिफारस आवश्यक आहे.

### अर्ज कसा करावा?

या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलचे https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावा. ऑनलाइन पद्धतीने केलेला अर्ज व प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) पंचायत समिती यांच्याकडे सादर करावा. अधिक माहितीसाठी कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) पंचायत समिती तसेच जिल्हा कृषी अधिकारी ( विशेष घटक योजना), जिल्हा परिषद, ठाणे यांच्याशी संपर्क साधावा.

# पोलीस भरतीत ३,९२४ पदांसाठी पावणेतीन लाख महिलांचे अर्ज

मुंबई : राज्यात महिला पोलीस भरतीसाठी यावेळी ३९२४ पदांसाठी पावणेतीन लाखांहून अधिक महिलांनी अर्ज केले आहेत. त्यापैकी एक लाखाहून अधिक महिला उमेदवार उच्चशिक्षित आहेत. मुंबईला सर्वाधिक पसंती असून एक लाखांहून अधिक महिलांनी मुंबई पोलीस दलातील भरतीसाठी अर्ज केले आहेत.

राज्य पोलीस दलातील १७ हजार ४७१ पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू आहे. त्यासाठी १६ लाख ८८ हजार ७८५ अर्ज प्राप्त झाले आहेत. राज्यातील पोलीस शिपाई व चालकांच्या एकूण पदांपैकी ३० टक्के पदे महिलांसाठी आरक्षित आहेत. राज्यभरात एकूण ३९२४ पदे महिला उमेदवारांसाठी उपलब्ध आहेत. या पदांसाठी दोन लाख ७८ हजार ८२९ महिला उमेदवारांनी अर्ज केले आहेत. म्हणजे प्रत्येक पदासाठी किमान ७१ महिला उमेदवारांमध्ये स्पर्धा आहे. राज्यात सर्वाधिक पसंती मुंबई विभागाला आहे. मुंबईत १२५७ पदांसाठी मैदानी परीक्षा सुरू आहे. त्यासाठी सुमारे एक लाख १० हजार महिला उमेदवारांनी अर्ज केले आहेत. दोन - तीन ठिकाणी अर्ज करणाऱ्या उमेदवारांची संख्या अधिक आहे. त्यात अनेकांनी मुंबईला पहिली पसंती दिल्यामुळे तुलनेने येथे अधिक अर्ज आले आहेत, असे अधिकाऱ्याने सांगितले.

पोलीस भरती प्रक्रियेसाठी राज्यातील ६६ केंद्रांपैकी २२ केंद्रांमध्ये लेखी परीक्षा घेण्यात आली आहे. मिरा - भाईंदर, छत्रपती संभाजी नगर शहर, नवी मुंबई, सोलापूर शहर, नाशिक शहर, अमरावती शहर, मुंबई लोहमार्ग, पालघर, सांगली, नाशिक ग्रामीण, अहमद नगर, धुळे, जळगाव, छत्रपती संभाजी नगर ग्रामीण, बीड, जालना, यवतमाळ, लातूर, वाशीम, भंडारा, वर्धा व पुणे लोहमार्ग या २२ पोलीस आयुक्तालय आणि पोलीस अधीक्षक कार्यालयांचा समावेश आहे. पावसामुळे मुंबईमध्ये वेळेवर मैदान उपलब्ध न झाल्यामुळे अद्याप मैदानी परीक्षेची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे ती सध्या तीन ठिकाणी सुरू असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

**■ एकूण १६,८८,७८५ अर्जांपैकी २,७८,८२९ महिला अर्जदार आहेत.**

**पोलीस शिपाई : रिक्त पदे ९५९५ एकूण अर्ज ७,८२,७९६, महिला अर्जदार १,७१,७६१**

**■ चालक : रिक्त पदे १६८६ एकूण अर्ज १,८३,०७०, महिला अर्जदार १५,६०९**

**■ कारागृह शिपाई : रिक्त पदे १८०० एकूण अर्ज ३,६१,४८३, महिला अर्जदार ८५,८०३**



ठाण्यातील तीनपेट्रोल पंप जवळ, पाचपाखाडी, ठाणे (प.) या ठिकाणी शारदा विद्यामंदिर या इमारतीच्या तळमजल्या वरील पिटस्टॉप कार क्सेसरिज दुकानाला आग लागली होती. सदर घटनेत आग लागल्याने दुकानातील सीट कव्हर व इतर कार क्सेसरिजचे साहित्य जळून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. (छाया : मनोज सिंह)

### जोपर्यंत महायुतीचे सरकार आहे तोपर्यंत योजना कुणीही बंद करू शकणार नाही : उपमुख्यमंत्री फडणवीस

# महायुती शासनाच्या माध्यमातून विविध जनकल्याणकारी योजना : आ. प्रशांत ठाकूर

पनवेल : भाजप महिला मोर्चाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या पनवेल येथील 'लाडक्या बहिणींचे लाडके देवाभाऊ' कार्यक्रमास हजारोंच्या संख्येने लाडक्या बहिणींनी उपस्थित राहून उदंड प्रतिसाद दिला. रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला अत्यंत उल्हासदायी वातावरणात झालेला हा कार्यक्रम जणू श्रावण महिन्यातील सणाचा साज लावणारा होता. यावेळी महिलांनी लाडके आमदार प्रशांत ठाकूर यांनाही राख्या बांधत हा आनंददायी सोहळा साजरा केला.



प्रदेश महिला मोर्चाच्या आवाहनानुसार उत्तर रायगड जिल्ह्याच्यावतीने आमदार प्रशांत ठाकूर व भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहरातील विरूपाक्ष मंगल कार्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातून राज्यातील महायुती सरकारच्या माध्यमातून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने महिलांच्या भावना जाणून घेण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दूरदृष्य प्रणालीद्वारे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लाडक्या बहिणींशी थेट संवाद साधला.

या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, अॅड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, मंजुषा कुद्रीमोती, पनवेल शहर महिला मोर्चाच्या अध्यक्षा राजश्री वावेकर, तालुकाध्यक्षा कमला देशेकर, माजी नगरसेविका, यांच्यासह महिला मोर्चाच्या जिल्हा पदाधिकारी, शहर व तालुका पदाधिकारी, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, महायुती सरकारच्या माध्यमातून विविध जनकल्याणकारी योजना राज्यातील नागरिकांसाठी राबविण्यात येत आहेत. या योजना अविरतपणे सुरू राहतील. सध्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे कार्यक्षम आहेत. नाहीतर त्यांच्या आधीचे मुख्यमंत्री घरून, फेसबुकवरून कारभार पहायचे. मुख्यमंत्री शिंदेंसोबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा हेही दमदारपणे काम करीत आहेत. देवेंद्रजींनी मराठा समाजाला आरक्षण दिले होते, मात्र महाविकास आघाडीच्या सरकारने न्यायालयात वेळवर वकील दिला नाही. त्यामुळे ते आरक्षण गेले. 'मविआ'वालेच आरक्षण जाण्यासाठी दोषी आहेत. असे सांगतानाच आपला लोकप्रतिनिधी आणि भाऊ म्हणून जास्तीत जास्त विकासकामे व योजना अंमलात आणण्याचे काम सातत्याने करत आलो आहे, यापुढेही तसाच आशीर्वाद पाठीशी राहू द्या, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी म्हटले की, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व महायुती सरकारने रक्षाबंधनाआधीच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून भगिनींना ओवाळणी दिली आहे. तर महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांनी महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी महायुतीचे सरकार कटिबद्ध असल्याचे सांगितले.

यावेळी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर रायगड जिल्ह्याशी संवाद साधताना पनवेल येथील सोनाली महाडिक यांनी, विरोधक ही योजना पुढे बंद होईल असे सांगत आहेत, ते खरं आहे का, असा प्रश्न विचारला. त्यावर बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हंटले कि, तुम्ही चांगला प्रश्न विचारला. जोपर्यंत महायुतीचे सरकार आहेत तोपर्यंत हे पैसे तुम्हाला निश्चितपणे मिळतील, असे सांगत लाडकी बहीण योजना कायम ठेवणार असल्याची ग्वाही दिली. तसेच ललिता कदम यांनीही या वेळी उपमुख्यमंत्र्यांशी संवाद साधत माझ्या मुलीने म्हणजे तुमच्या भाचीने तुमचे खास आभार मानले आहेत, असे सांगितले.

या वेळी महिलांनी देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी राख्या आणल्या होत्या, त्या राख्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात येणार आहेत. त्याचबरोबर पनवेल विधानसभेचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर अर्थात सर्वांचे लाडके दादा, तसेच जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनाही महिलांनी राख्या बांधत त्यांचेही औक्षण केले. यावेळी विरुपाक्ष मंगल कार्यालयाचे दोन्ही सभागृह लाडक्या बहिणींच्या साक्षीने तुडुंब भरले होते.

*महायुती सरकारने आणलेली लाडकी बहीण योजना बंद होईल, अशी अफवा विरोधक पसरवत आहेत. सावत्र भावांवर विश्वास ठेवू नका, हे भाऊ कालही काही देत नव्हते आणि आजही काही देत नाहीत. तुमच्या आशीर्वादाने आपल्या सरकारने ३१ मार्चपर्यंतचे पैसे अर्थसंकल्पात ठेवले आहेत. अर्थसंकल्पात नियमाने एकाच वर्षाचे पैसे ठेवता येतात, जर पाच वर्षाचे ठेवता आले असते तर आताच ठेवून दिले असते. पण तुम्ही काळजी करू नका जोपर्यंत महायुतीचे सरकार आहे तो पर्यंत हि योजना कुणीही बंद करू शकणार नाही.*

*–उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस*

भावाला राखी बांधण्यासाठी निघालेल्या महिलेची शोकांतिका

## दुचाकी अपघातात पतीसह जागीच मृत्यू

वसई : रक्षाबंधनासाठी भावाला भेटायला निघालेल्या महिला आणि तिच्या पतीचे दुचाकीच्या अपघातात निधन झाले. मुंबई अहमदाबाद महामार्गावरील पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा अपघात घडला. अपघातानंतर ट्रकचालक फरार झाला होता. नंतर त्याला मांडवी पोलिसांनी अटक केली. प्रेमा उपाध्याय (६२) या पती रुपचंद उपाध्याय (६२) आणि मुलगा संदीप आणि सुनेसह मिरा रोडच्या पूनम विहारमधील आविष्कार गार्डनमध्ये राहतात. प्रेमा उपाध्याय यांचा भाऊ विरारमध्ये राहतो. सोमवारी रक्षाबंधनाचा सण असल्याने त्या भावाला राखी बांधण्यासाठी निघाल्या होत्या. रविवारी संध्याकाळी ते पती रुपचंद उपाध्याय यांच्या दुचाकीवरून (हिरों होंडा स्पेलंडर- एमएच ०४ बीए ३९००) निघाल्या होत्या. रविवारी रात्री भावाकडे मुक्काम करून सोमवारी राखी बांधून त्या परतणार होत्या. उपाध्याय दाम्पत्य विरारला जाण्यासाठी मुंबई अहमदाबाद महामार्गावरून निघाले होते. संध्याकाळी साडेपाचच्या सुमरास ते पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीतून जाच असताना रिलायबल सोसायटीसमोर एक भरधाव वेगाने जाणार्या ट्रकने (आरजे ३० जीए ९२२५) दुचाकीला धडक दिली. ही घडक एवढी जोरात होती की उपाध्याय दाम्पत्य रस्त्यावर फेकले गेले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे उपाध्याय कुटुंबावर शोककळा पसरली आहे. अपघातानंतर ट्रकचालक घटनास्थळावरून पसार झाला होता. पेल्हार पोलिसांनी सीसीटीव्हीवरून त्याच्या ट्रकचा क्रमांक मिळवला होता. त्याची माहिती महामार्गावरील सर्व पोलीस ठाण्यांना देण्यात आली होती. मांडवी पोलिसांनी फरार ट्रकचालक प्रकाशचंद्र रावत (३०) याला अटक केली. त्याच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६ (१) २८१, १२५ (ए) १३५ (ब) तसेच मोटार वाहन कायद्याच्या कलम १८४, १८७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण'

नवी मुंबई : महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण' योजनेंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेत ६ महिन्यांच्या कालावधीकरिता शिकाऊ उमेदवार म्हणून प्रशिक्षण देणेकामी ३० संवर्गातील एकूण १९४ पदांसाठी दि.१४ व २० ऑगस्ट २०२४ रोजी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पात्र १४४ उमेदवारांची ६ महिन्यांच्या कार्य प्रशिक्षणाकरिता (इंटर्नशिप) निवड करण्यात आली आहे. उर्वरित ५० पदांकरिता यापूर्वीच जाहीर केल्याप्रमाणे मंगळवार दि.२० ऑगस्ट रोजी विशेष शिबीर महानगरपालिका मुख्यालयात संपन्न होत आहे. तरी यावेळी शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी आपले संपूर्ण नाव, पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता, भ्रमणध्वनी/दूरध्वनी क्रमांक, मेल-आयडी/शैक्षणिक अर्हता, जन्मतारीख, बँक तपशील इ. कागदपत्रांसह सकाळी १० वा. आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे असे सूचित करण्यात येत आहे.

## टिटवाळ्यातील ४० हून अधिक बेकायदा चाळी भुईसपाट

कल्याण : टिटवाळा पूर्व भागातील गणेशनगर, आर. के. नगर परिसरात भूमाफियांनी उभारलेल्या ४० हून अधिक बेकायदा चाळी, चाळींचे जोते अ प्रभागाच्या तोडकाम पथकाने साहाय्यक आयुक्तांच्या उपस्थितीत भुईसपाट केले. टिटवाळा, मांडा परिसरातील बेकायदा चाळींच्या बाबतीत पालिकेत तक्रारी वाढल्याने या बेकायदा चाळी जमीनदोस्त करण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे.

टिटवाळा पूर्व भागातील गणेशनगर, आर. के. नगर भागात सर्वाधिक बेकायदा चाळी, या भागात चाळी उभारणीसाठी नवीन जोती बांधण्याची कामे मोठ्या प्रमाणात सुरू असल्याची माहिती अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संदीप रोकडे यांना मिळाली होती. या बेकायदा चाळींची प्रत्यक्ष पाहणी करून झाल्यानंतर आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या आदेशावरून अतिक्रमण नियंत्रण उपायुक्त अवधूत तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली साहाय्यक आयुक्त रोकडे, अधीक्षक नंदकिशोर वाणी यांच्या तोडकाम पथकाने गणेशनगर, आर. के. नगर भागात जाऊन तेथील बेकायदा चाळी जेसीबीच्या साहाय्याने भुईसपाट केल्या. यामध्ये ४० हून अधिक चाळी आणि जोत्यांची बांधकामे तोडण्यात आली.

टिटवाळा भागातील बनेली, बल्याणी भागात गेल्या दहा वर्षाच्या काळात याभागातील टेकड्या, डोंगर खोदून भूमाफियांनी बेकायदा चाळी उभारल्या आहेत. टिटवाळा भागात बेकायदा बांधकामांच्या विरोधात जोरदार तोडकाम मोहीम सुरू झाल्याने भूमाफियांमध्ये अस्वस्थता पसरली आहे.

टिटवाळा, मांडा परिसरात उभारण्यात आलेल्या बेकायदा चाळी तोडण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे. टप्प्याटप्प्याने ही बेकायदा चाळी, गाळ्यांची बेकायदा बांधकामे जमीनदोस्त केली जातील. काही चाळींमध्ये रहिवास असल्याने ही बांधकामे पावसाळ्या संपल्यानंतर तोडण्याची मोहीम सुरू केली जाईल. प्रभागात एकही नवीन बेकायदा बांधकाम उभे राहणार नाही याची दक्षता घेतली जाणार आहे.

– संदीप रोकडे,
साहाय्यक आयुक्त, अ प्रभाग, टिटवाळा.

## भोंगा वाजविल्याच्या रागातून ठाकुर्लीत रिक्षा चालकाच्या डोक्यात दगड मारला

कल्याण : रस्त्यामधून चालणाऱ्या पादचाऱ्यांना दूर करण्यासाठी शनिवारी रात्री साडे बारा वाजता ठाकुर्ली भागात राहत असलेल्या एका रिक्षा चालकाने ठाकुर्ली पूर्व रेल्वे स्थानकाच्या भागातील रस्त्यावरून जात असताना भोंगा वाजविला. त्याचा राग एका पादचाऱ्याला आला. त्याने रिक्षा चालकाला भोंगा का वाजविला, असा प्रश्न करून बाजूला पडलेला एक मोठा दगड रिक्षा चाकाच्या डोक्यात मारून त्याला गंभीर जखमी केले. पादचाऱ्याने अचानक हल्ला केल्याने रिक्षा चालक गंभीर जखमी झाला. त्याच्या डोक्यात दगडाचा वर्मी घाव बसला. त्यामुळे तो रक्तबंबाळ झाला. इतर प्रवाशांनी मध्यस्थी करून पादचाऱ्याला दूर केले, अन्यथा पादचाऱ्याने रिक्षा चालकाला आणखी मारहाण केली असती, असे प्रत्यक्षदर्शीने सांगितले. लक्ष्मण चौधरी असे रिक्षा चालकाचे नाव आहे. ते ठाकुर्ली पूर्वेतील विसर्जन तलाव भागातील एका सोसायटीत कुटुंबीयांसह राहतात. शनिवारी रात्री साडे बारा वाजण्याच्या दरम्यान ते प्रवासी वाहतूक करत होते. काही प्रवासी रस्त्याच्या मध्यभागातून पायी चालले होते. त्यांना बाजूला करण्यासाठी रिक्षा चालक चौधरी यांनी रिक्षेचा भोंगा वाजविला. त्यावेळी त्या प्रवाशाला राग आला. त्याने लक्ष्मण यांना भोंगा का वाजविला असा प्रश्न केला. आपण रस्त्याच्या मध्य भागातून चालला होता. तुम्हाला रिक्षेचा धक्का लागला असता म्हणून भोंगा वाजवून बाजूला होण्याचा इशारा दिला, असे लक्ष्मण चौधरी यांनी पादचाऱ्याला सांगितले.

## प्लास्टिक प्रतिबंधाकडे विशेष लक्ष द्या : आयुक्त डॉ. कैलास शिंदे

नवी मुंबई : यावर्षीचा गणेशोत्सव 'प्लास्टिकमुक्त' असावा ही संकल्पना नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी व्यापक प्रयत्न करावेत व त्या अनुषंगाने गणेशोत्सवाच्या सजावटीत प्लास्टिक, थर्माकोल व फोमचा वापर न करता कागद, कापड व पुनर्वापरयोग्य साहित्याचा वापर करण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहित करावे आणि त्यादृष्टीने जनजागृती करावी असे निर्देश नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीप्रसंगी दिले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, अतिरिक्त आयुक्त तथा शहर अभियंता शिरीष आरदवाड व इतर विभागप्रमुख उपस्थित होते.

गणेशोत्सव मंडळांना सुलभ रितीने मंडप परवानगी प्राप्त व्हावी याकरिता महानगरपालिकेच्या वतीने इ-सेवा संगणक प्रणाली सुरु करण्यात आली असून https:// app.nmmconline.in या संकेतस्थळावर मंडळांनी अर्ज करून सहजपणे परवानगी प्राप्त करून घ्यावी याची व्यापक प्रसिध्दी करावी. यादृष्टीने गणेशोत्सव मंडळांच्या विभाग कार्यालय स्तरावर बैठका घ्याव्यात असे आयुक्तांमार्फत निर्देशित करण्यात आले.

प्लास्टिकमुक्त मार्केट, प्लास्टिकमुक्त शाळा, प्लास्टिकमुक्त कार्यालये करण्याकडे विशेष लक्ष दिले जावे व तशा प्रकारचे आवाहन नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील इतरही शासकीय कार्यालयांना करावे असे सूचित करतानाच आयुक्तांनी सर्व कार्यालयातील प्लास्टिक बॉटल्सचा वापर थांबवावा व तेथे प्लास्टिक श्रेडींग मशीन्स बसवाव्यात अशा सूचना केल्या.



ऊन, वारा, पावसात रस्त्यावर कर्तव्य बजावणाऱ्या वाहतुक पोलिसांना डॉ. बेडेकर विद्यामंदिरच्या स्कॉऊट गाईच्या विद्यार्थीनीनी राख्या बांधून रक्षाबंधन केले. (छाया : मनोज सिंह)

प्रारूप विकास योजनेच्या नकाशाबाबत प्रश्नांच्या निराकरणासाठी

## 'विकास योजना कक्ष' स्थापन

पनवेल : महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये पनवेल महानगरपालिका क्षेत्रासाठी सुधारित व एकत्रित प्रारुप विकास योजनेचे प्रसिद्धीकरण दिनांक ०८ ऑगस्ट रोजी करण्यात आले आहे. महानगरपालिका आयुक्त श्री.मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार पनवेल महापालिका क्षेत्रासाठी प्रसिद्ध केलेले सुधारित व एकत्रित प्रारूप विकास योजनेच्या नकाशाबाबत नागरिकांना काही प्रश्न उद्भवल्यास त्याचे निराकरण करण्यासाठी पनवेल महानगरपालिका अग्निशमन इमारत ३ रा मजला येथे विकास योजना कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

या सुधारित व एकत्रित प्रारुप विकास योजनेचे नकाशे पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या वेबसाईटवर नागरिकांना अवलोकनार्थ उपलब्ध आहेत. हे नकाशे न्ड्रॉईड व आय फोनवर अगदी सहज डाऊनलोड करता येऊ शकतील आशा स्वरूपात उपलब्ध आहेत. नकाशाची प्रत किंवा भागशः नकाशा पाहिजे असल्यास शुल्क आकारून नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत. पनवेल महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या सुधारित व एकत्रित प्रारुप विकास योजनेबाबत नागरिकांना सूचना व हरकती घेण्याची मुदत ही योजना प्रसिद्ध झालेपासुन ३० दिवसात म्हणजेच दिनांक ०७ सप्टेंबर २०२४ पर्यंत आहे. नागरिकांना याबाबत काही शंका असल्यास विकास योजना कक्षाशी संपर्क साधावा असे आवाहन आयुक्त श्री. मंगेश चितळे यांनी केले आहे.

**सुधारित व एकत्रित प्रारूप विकास योजनेच्या नकाशाबाबत नागरिकांना काही प्रश्न उद्भवल्यास त्याचे निराकरण करण्यासाठी खालील नमूद अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.**

१.विठ्ठल धायगुडे
मोबाईल क्रमांक :८१०४७४९९७३
गावाचे नाव : पनवेल, नागझरी, चाळ, घोट, धानसर, धरणगाव, धरणाकॅम्प, तुर्भे, पिसार्वे

२.रणजीत कोरे
मोबाईल क्रमांक: ९९७०४२६७३७
गावाचे नाव : रोहिंजन, बीड, आडवली, तळोजा मजकूर, कोयनावळे, करवले बुद्रुक

३.अनिकेत दुर्गवले
मोबाईल क्रमांक: ७५०७०२१३६२
गावाचे नाव: कळंबोली-रोडपाली, कामोठे, नवीन पनवेल, आसुडगाव, टेंभोडे, काळुंद्रे, खारघर, ओवे, देवीचा पाडा, पालेखुर्द

४.शुभम गायकवाड
मोबाईल क्रमांक ९४२०६०६६९९
गावाचे नाव:पडघे, वळवली, तळोजे पाचनंद, नावडे, तोंडरे, पेंधर, खिडूकपाडा.

## मिरा भाईंदरमधील हजारो महिलांना मिळाले 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'चे पैसे

भाईंदर : राज्यात 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'चे पैसे महिलांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली असून मिरा भाईंदर मधील हजारो महिलांच्या खात्यावर ३ हजार रुपये जमा झाले आहेत. अजूनही या योजनेचे फॉर्म भरले जात असून ज्यांनी फॉर्म अद्यापि भरले नाहीत त्यांनी ते भरावे. ज्यांच्या खात्यावर ३ हजार रुपये जमा झाले आहेत, अशा लाभार्थी महिलांनी आज आमदार प्रताप सरनाईक यांच्या व राज्य सरकार प्रती कृतज्ञता व्यक्त केली. आमदार सरनाईक यांना राख्या बांधण्यासाठी मिरा भाईंदर मधील हजारो महिलांची गर्दी झाली होती. त्यातील शेकडो लाडक्या बहिणींनी आमदार सरनाईक यांना रक्षाबंधन करून लाडकी बहीण योजना यशस्वी झाल्याचा आनंद व्यक्त केला. हा रक्षाबंधन सोहळा म्हणजे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा वचनपूर्ती सोहळा झाला.



'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले' असे आमचे सरकार आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना राज्य सरकारने आणली. त्याचा मनापासून आनंद आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' म्हणजे माता-भगिनींप्रती कृतज्ञता आहे. आतापर्यंत या योजनेअंतर्गत १ कोटी ३ लाख लाडक्या बहिणींना ओवाळणी म्हणून खात्यावर पैसे जमा झाले आहेत. मिरा भाईंदर मधील ५२ हजारहून अधिक महिलांनी या योजनेत अर्ज केले आहेत. यातील हजारो महिलांच्या खात्यावर जुलै व ऑगस्ट महिन्याचे मिळून ३ हजार जमा झाले आहेत. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत शिंदे सरकारने या योजनेचे जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे पैसे १७ ऑगस्ट २०२४ ला पात्र महिलांच्या खात्यात जमा करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु त्यापूर्वी १५ ऑगस्टचे निमित्त साधत १४ ऑगस्ट पासून राज्यातील बहिणींच्या खात्यात पैसे जमा होण्यास सुरुवात झाली. मिरा भाईंदर मधीलही हजारो भगिनींच्या खात्यावर लाडकी बहीण योजनेचे पैसे जमा झाले आहेत. त्यामळे महिला वर्गात आनंद आहे आणि राज्य सरकारला धन्यवाद दिले जात आहेत.

रक्षाबंधनाच्या आधीच महाराष्ट्रातील १ कोटी ३ लाख लाडक्या बहिणींना ओवाळणी म्हणून खात्यात ३००० जमा झाले आहेत. त्यातील मीरा भाईंदर शहरातील हजारो महिलांना पैसे खात्यावर आले आहेत. ३१ जुलैपर्यंत आलेल्या फॉर्म्सचेच हे पैसे असून ३१ ऑगस्टपर्यंत फॉर्म भरणाऱ्या बहिणींच्या खात्यातही तब्बल ३ महिन्यांची रक्कम जमा होणार आहे. आमच्या बहिणींना पैसे देण्याचा निर्धार आम्ही पूर्ण केला. आमच्या माता-भगिनींप्रती आमची ही कृतज्ञता आहे, असे आमदार म्हणाले. ही योजना सुरूच राहणार आहे. ज्या महिलांचे फॉर्म भरण्यासाठी काही कागदपत्रे नाहीत किंवा त्यांना अडचणी येत आहेत त्यांना शिवसेना शाखा व आमदार प्रताप सरनाईक यांच्या कार्यालयातून सहकार्य केले जाईल. असेही आमदार सरनाईक यांनी सांगितले. यावेळी जिल्हाप्रमुख राजू भोईर , शिवसेनेच्या महिला जिल्हा संघटक निशा नार्वेकर , विधानसभा क्षेत्र प्रमुख विक्रम प्रताप सिंग , सचिन मांजरेकर , पूजा आमगावकर व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१